

# मेट्रो ३ च्या स्थानकाचा आराखडा बनवणार विद्यार्थी

## आर्किटेक्ट व इंजिनिअरिंगचे ९५ विद्यार्थी घेताहेत मेहनत

**मुंबई ▸▸** कुलाबा- वांद्रे- सीप्झ मार्गावरील भूमिगत मेट्रोच्या तीन स्थानकांचा आराखडा बनवण्यासाठी मुंबईतील ९५ विद्यार्थी मेहनत घेत आहेत. मेट्रो स्थानक व त्याच्या आसपासचा परिसर कसा असावा यासंदर्भात हे विद्यार्थी आराखडा तयार करत आहेत. मुंबईतील विविध आर्किटेक्ट व इंजिनियरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या यात समावेश आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) कुलाबा- वांद्रे- सीप्झ मार्गावर भूमिगत मेट्रो ३ चे काम सध्या वेगात सुरू आहे. या मार्गावर २७ स्थानके असून, यातील २६ स्थानके भूमिगत तर एक स्थानक हे जमिनीवर आहे. मेट्रो -३ च्या मार्गावर उभारण्यात येणारी तीन स्थानके व त्यांच्या आसपासचा परिसर कसा असावा याचा आराखडा बनवण्याचे काम मुंबईतील आर्किटेक्चर आणि इंजिनियरिंग कॉलेजमधील ९५ विद्यार्थ्यांवर सोपवले आहे. मेट्रोच्या तीन स्थानकांचा आरखडा तयार करण्यासाठी एमएमआरसीने ऑब्जर्व्हर रिसर्च फाऊंडेशनच्या सहकार्याने मुंबईतील आर्किटेक्चर वं इंजिनियरिंग विद्यार्थ्यांची एक स्पर्धा घेतली. या स्पर्धेमध्ये मुंबईतील ५१ कॉलेजचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक टीमला मेट्रोच्या स्थानकाचा आराखडा बनवण्यास सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ५१ टीमनी बनवलेल्या आराखड्यातून १९ टीमच्या आराखड्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मेट्रो स्थानक व त्याच्या परिसराच्या आराखड्याचा तीन हजार शब्दांमध्ये विस्तृत स्वरुपात अहवाल सादर करण्यास एमएमआरसीकडून सांगण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेला आराखडा व अहवाल विशेष समितीच्या समोर ठेवण्यात येणार आहे. यातून अंतिम निवड होणारा आराखडा व अहवाल नोव्हेंबरमध्ये मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी व मुख्यमंत्र्यांसमोर सादर केला जाणार आहे.

### भविष्याच्या गरजा लक्षात घेणार

वाढती वाहतूक कोंडी व भविष्यातील बदलती परिस्थिती लक्षात घेऊन मेट्रोच्या स्थानकांचा आराखडा बनवण्यास विद्यार्थ्यांना सांगण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी हे १९ ते २२ वर्षे वयोगटातील आहेत, असे आब्जर्वर रिसर्च फाउंडेशनच्या सदस्य सायली मानकीकार यांनी सांगितले.